**यशवंत सहदेव पोपकर वि.**

**प्रसाद अशोक पोपकर वगैरे**

## निशाणी क्रमांक १४ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांच्याविरुध्द पारीत 'विना कैफियत' आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या मते, प्रतिवादी क्र.१ यांचे वडील गेल्या १५ वर्षांपासून आजारपणामुळे अंथरुणाला खिळून आहेत. त्यामुळे त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ यांचेवर आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांना कैफियतीसाठी आवश्यक ती कागदपत्रे वेळेवर उपलब्ध करुन घेऊन त्यांना मुदतीत त्यांची कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द 'कैफियत नाही' असा आदेश पारीत झालेला आहे. सदरचा विलंब त्यांनी जाणूनबुजून केलेला नाही. प्रतिवादींविरुध्द पारीत आदेश रद्द न झालेस त्यांचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणार असून त्यांना नैसर्गिक न्यायाला मुकावे लागणारे आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द पारीत 'विना कैफियत' आदेश रद्द करण्याची विनंती केलेली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करून आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांच्या अर्जातील मजकूर खोटा व खोडसाळ असून तो मान्य व कबूल नाही. प्रतिवादी यांना दि.१८/१०/२०२३ रोजी दाव्याचे समन्स व नोटीसची बजावणी झालेली आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी ९० दिवसांत कैफियत दाखल करणे कायदयाने आवश्यक होते. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास दिलेले कारण हे खोटे व खोडसाळ आहे. प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास सुमारे १ वर्षे २ महिने ३ दिवसांचा विलंब केलेला आहे. सदर विलंबाबाबत दिलेले कारण संयुक्तीक नाही. तसेच प्रतिवादी यांनी अर्जाच्या पुष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द आज्ञार्थी व कायम ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १६/१०/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ आपले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

त्यामुळे अर्जातील कथने विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. परंतु दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना संधी दिल्यास ते न्यायोचित होईल. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु कैफियत दाखल न केल्याने वादीची झालेली गैरसोय योग्य तो खर्च आकारुन भरुन काढणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा नि.१४ वरील अर्ज वादीस खर्चादाखल रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेविरूध्द पारीत 'विना कैफियत' आदेश रद्द करणेत येतो.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे. त्यानंतरच प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर नोंदविण्यात येईल.

४. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी खर्चाची रक्कम वादीस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND Date: 2025.01.29 18:02:53 +0530

दिनांक- २८/०१/२०२५ (श्रीमती आर. जी. कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी